# कोरोना संकटाचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम : कृषीच्या संदर्भात

**डॉ. सुनिल शिंदे**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
भिवापूर महाविद्यालय,
भिवापूर

**प्रस्तावना :**

कोरोना हा विषाणू श्वसनाचा त्रास वाढविणारा विषाणू आहे. हा सर्वप्रथम चीनच्या हुएई प्रांताच्या वुहान शहरामध्ये आढळला. या विषाणूमुळे पसरणाऱ्या रोगाची लक्षणे ही न्युमोनियासारखी आहे. हा एक संसर्गजन्य रोग असून या रोगाची व्याप्ती ही केवळ चीनपुरतीच मर्यादीत राहिली नसून या विषाणूने संपूर्ण जग आपल्या जाळ्यात ओढले आहे. संपूर्ण जगासमोर महामारीचे संकट निर्माण केले आहे. आजच्या स्थितीला जागतिक स्तरावरील अनेक विकसित व विकसनशिल राष्ट्रांमध्ये या रोगाचा प्रसार झाला आहे.चीनसोबतच अेमेरिका, इटली, स्पेन, फ्रांस, इंग्लंड, जर्मनी, टर्की, ईराण, रशिया, पाकिस्तान, जपान, द. कोरीया, बांग्लादेश या देशासोबतच भारतामध्ये या रोगाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात झालेला आहे. व तो दिवसेंदिवस वाढतच आहे. त्यामुळे लाखो लोकांचा मृत्यु झाला आहे तर लाखो लोकांना या विषाणूचा प्रादुर्भाव झाला आहे. संध्यातरी या विषाणूवर हमखास असे औषधी किंवा लस उपलब्ध नूसन अनेक राष्ट्रातील शास्त्रज्ञ कोरोना या विषाणूवर लस शोधुन काढण्यासाठी शर्तीचे प्रयत्न करीत आहे. परंतु सध्यातरी लस शोधुन काढण्यात शास्त्रज्ञांना यश आलेले नाही. कोरोना व्हायरस संकटामुळे संपूर्ण जगाची अर्थव्यवस्था ठप्प पडली असतांनाच आंतरराष्ट्रीय मुद्रानिधीने कोरोना विषाणूच्या महामारीने जगाला आर्थिक संकटात लोटले असून सध्याचे आर्थिक संकट हे १९३० नंतरचं सर्वात मोठी जागतिक घसरण असेल असा धोक्याचा इशारा दिला आहे. अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेला या वर्षात ५.९ टक्के नुकसान होईल हे नुकसान १९४६ नंतर अमेरिकेचे मोठे नुकसान असणार आहे तसेच या वर्षीचा अमेरिकेचा बेरोजगारीचा दर १०.४ टक्के असेल असा अंदाज मुद्रानिधीने वर्तविला आहे. अमेरिकेप्रमाणेच १९० पेक्षाही अधिक देश कोरोनामुळे प्रभावित झाले असून या देशांनाही कोरोना संकटामुळे मोठे नुकसान सहन करावे लागणार आहे. आर्थिक प्रगतीचे रेटिंग ठरविणाऱ्या 'मूडीज' या संस्थेने सुरवातीला भारताचा विकासदर २०२० मध्ये ५.३ टक्के राहील, असं भाकीत केले होते. पण आता त्यांनी सांगितल आहे की, कोरोना संकटाच्या पार्श्वभूमीत भारताचा विकास दर हा २.५ टक्यापेक्षा जास्त राहणार नाही. आजच्या स्थितीत प्रत्येकच देशामध्ये कोरोना संकटामुळे ढासळलेली अर्थव्यवस्था, तोट्यामध्ये आलेले उद्योग, बंद पडलेले उद्योग व व्यवसाय आणि यामधून निर्माण झालेली बेरोजगारी आणि लाखो स्थलांतरीत झालेल्या मजूरांची समस्या हे कोरोना संकटानंतरचे मोठे आव्हाण असणार आहे.

**कोरोना विषाणूची पार्श्वभूमी :**

या विषाणूची बाधा झाल्याची पहिली घटना चीनमधील वुहानमध्ये डिसेंबर २०१९ मध्ये घडली. या विषाणूचा संसर्ग वुहान शहरातील मासळी बाजारातून झाला असे सांगण्यात येत आहे. कारण कोरोना विषाणूचा पहिला रूग्ण हा या शहरामध्येच आढळला आणि नंतर त्याने वेगाने इतर भागामध्ये शिरकाव केला. हा संसर्गजन्य रोग कारोना बाधित व्यक्तिच्या संपर्कात आल्यामुळे होत असल्याने चीनने सर्वप्रथम हुएई प्रांतातील लोकांच्या प्रवासावर बंधने टाकून सार्वजनिक ठिकाणी मास्क घालने लोकांना अनिवार्य केले. चीनमधून इतर राष्ट्रांमध्ये कोरोना विषाणूचा झालेला प्रवेश व संसर्ग हा चीनमधून इतर राष्ट्रामध्ये कोरोना बाधित व्यक्तिच्या प्रवासामुळे झालेला आहे. त्यामुळे ज्या ज्या राष्टामध्ये चीनमधिल बाधित व्यक्तींनी प्रवास केला त्या देशांमध्ये या व्यक्तीच्या संपर्कात आलेल्या व्यक्तींना कोरोना विषाणूची लागण झाली. भारतातील पहिला कारोना रूग्ण हा विद्यार्थी असून चीनमधील हुआन विद्यापीठात शिक्षण घेत होता. भारतात परतल्यानंतर त्याची तपासणी केल्यानंतर तो पॉझिटिव्ह आढळून आला. भारतात कोरोनाचा पहिला बळी ७६ वर्षीय वृध्द असून तो कर्नाटकातील कलबुर्गी येथिल आहे. महाराष्ट्रामध्ये कोरोना बाधित पहिल्या रूग्णाची नोंद ९ मार्च २०२० रोजी झाली असून १७ मार्च रोजी महाराष्ट्रात पहिल्या कोरोना बाधीत व्यक्तीच्या मृत्यूची नोंद झाली. महाराष्ट्र हे देशातील कोरोनाचा सर्वाधिक प्रभाव झालेले राज्य आहे. जगभरातील १९० पेक्षाही जास्त देशामध्ये या विषाणूने प्रवेश केला असून जागतिक आरोग्य संघटनेने ॅभ्द्ध ११ मार्च २०२० रोजी कोरोनामुळे जागतिक महारोगराई निर्माण झाल्याची घोषणा केली. जागतिक आरोग्य संघटनेने या विषाणूमुळे होणाऱ्या आजाराचे अधिकृत नामकरण ब्व्टप्क.१९ असे केले आहे.

**कोरोना व्हायरस म्हणजे काय?**

कोरोना व्हायरस म्हणजे विषाणूंमधील अशी एक मोठी जात ज्यामुळे मानव किंवा प्राणी आजारी पडतात. मानवाला या विषाणूचा संसर्ग झाल्यास सर्दीपासून ते श्वसन यंत्रणेत संसर्ग होण्याचा धोका असतो. कोरोना व्हायरसमुळे ब्व्टप्क.१९ हा आजार होतो हे नुकतेच सिध्द झाल आहे. सध्या संपूर्ण जगात थैमान घालणारी कोविड—१९ च्या साथीला कारणीभूत असलेल्या कोरोना विषाणूचा उगम चीनमध्ये प्राण्यांमधून झाला हा विषाणू जनुकीय गुणसुत्रात मुद्दम फेरबदल करून प्रयोगशाळतेत तयार केलेला नाही, असे ठाम प्रतिपादन जागतिक आरोग्य संघटनेने केले आहे.

**कोरोना संकटात कृषीचे योगदान :**

कृषी हे कोणत्याही देशातील लोकांची अन्नाची गरज पूर्ण करण्याचे महत्वाचे क्षेत्र आहे. मानवाच्या इतर कोणत्याही गरजेपेक्षा अन्न ही मानवाची प्राथमिक आणि सर्वात महत्वाची गरज आहे. अन्नाशिवाय माणूस जीवंत राहू शकत नाही. भारतामध्ये कोरोना संकटाच्या काळात अन्नावाचून उपासमारीची नोंद न करता आलेली झालेली ब्व्टप्क.१९ ही

कदाचीत पहिलीच नैसर्गिक आपत्ती असेल. याअगोदर १९४३ मध्ये बंगाल येथे पडलेल्या दुष्काळामुळे ३ दशलक्ष लोक मरण पावले. १९७२—७३ च्या महाराष्ट्रातील दुष्काळात अंदाजे १ लाख ३३ हजारापेक्षा जास्त लोकांचा मृत्यु झाला. परंतु सध्याच्या कोरोनाच्या संकटामध्ये सरकारने गरजु व गरीब लोकांसाठी जाहिर केलेलल्या आर्थिक पॅकेजमुळे आणि लोकांना स्वस्त व मोफत दरात सार्वजनिक वितरण प्रणालीच्या माध्यमातून केलेल्या अन्नधान्याच्या व्यापक पुरवठ्यामुळे तसेच विविध धार्मिक संस्था, सामाजिक संस्था, सामाजिक कार्यकर्ते यांनी मानवतेच्या दृष्टीकोनातून गरजु लोकांना करीत असलेल्या अन्नधान्य, जीवनावश्यक वस्तू आणि कम्युनिटी किचन या उपक्रमामुळे गरजु व गरीब लोकांना मोठ्या प्रमाणात अन्नधान्य, जीवनावश्यक वस्तू आणि जेवणाची सोय उपलब्ध झालेली आहे. त्यामुळे कोणीही उपासमारीने मृत्युमुखी पडले असे चित्र समोर आले नाही. अर्थात या सर्व जीवनावश्यक वस्तूंचे उत्पादन शेतीक्षेत्रामध्ये केले जाते. त्यामुळे कोरोना संकटाच्या काळात कृषीचे योगदान प्राधान्याने राहिले आहे.

**कोरोना संकटाचा अर्थव्यवस्थेवरील आर्थिक परिणाम :**

कोरोना विषाणूमुळे निर्माण झालेले आर्थिक संकट हे जागतिक असून या संकटामुळे जगातिल विकसित आणि श्रीमंत देशाच्या अर्थव्यवस्थेसोबतच आर्थिक महासत्तेकडे वाटचाल करणाऱ्या भारतीय अर्थव्यस्थेला फार मोठा फटका बसला आहे. कोरोना विषाणूचा संसर्ग हा बाधीत व्यक्तीच्या संपर्कात आल्यामुळे होत असल्याने अनेक राष्ट्रांनी देशाच्या विदेशी प्रवास व वाहतूकीच्या सीमा बंद करून देशातील संसर्ग रोखण्यासाठी लॉकडाऊचा मार्ग अवलंबीला आहे. भारताने सुध्दा कोरोनाचा संसर्ग वाढू नये यासाठी विदेशी प्रवासी वाहतूक बंद करून देशांतर्गत कोरोनाची लागण झालेल्या व्यक्तीच्या संपर्कात इतर व्यक्ती येऊ नयेत यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशामध्ये लॉकडाऊच्या उपायाचा अवलंब केलेला आहे. २५ मार्च २०२० ला २१ दिवसांकरीता पहिला लॉकडाऊन घोषित केला. त्यानंतर दुसरा लॉकडाऊन हा १९ दिवंसांसाठी आणि सध्या सुरू असलेलो तिसरा लॉकडाऊन हा १४ दिवसांसाठी घोषीत केला. या लॉकडाऊमुळे देशामध्ये अत्यावश्यक सेवेतील उत्पादनांची निर्मिती व विक्री सोडून इतर सर्व वस्तू व सेवांच्या निर्मिती आणि विक्रीवर प्रतिबंध आणले गेले. त्यामुळे भारतातील बहुतांश सर्व छोटे मोठे उद्योग, सेवा, बांधकाम व्यवसाय, व्यापार, किरकोळ धंदे इत्यादीतील आर्थिक व्यवहार संपूर्ण ठप्प पडलेले आहेत याचा भयंकर व दुरगामी परिणाम अर्थव्यवस्थेवर होत आहे. कोरोना व्हायरसचा मोठा तडाखा शेअर मार्केटला बसला आहे. २००९ मध्ये शेअर बाजारात जे भितीचे वातावरण होते त्यापेक्षाही मोठे संकट कोसळतांना दिसत आहे. फेब्रुवारीच्या सुरवातील रूप्या आणि डॉलरचा विनिमय दर एका डॉलरला ७१.३७ रूपये होता तो मार्चच्या मध्यात ७४.२१ रूपये झाला. आणि येणाऱ्या काळात तो आणखी कमजोर होऊन ७६ रूपयापर्यंत जाऊ शकतो अशी स्थिती निर्माण झाली आहे. औषधी उद्योगासमोर नजीकच्या काळात संकट उभे राहु शकते. भारतामध्ये औषधीसाठी लागणाऱ्या कच्चा मालापैकी ८० टक्के आयात एकट्या चिनकडून होते ती सध्या बंद आहे. पर्यटन, विदेशी वाहतूक, हॉटेल, रेस्टारेन्ट या उद्योगाला कोरोना संकटामुळे फार मोठी किंमत चुकवावी लागणार आहे.

**कोरोना संकटाचा कृषी क्षेत्रावरील परिणाम :**

कोरोनाचे संकट येण्यापूर्वी भारतामध्ये कृषीसाठी अनुकूल ठरलेल्या नैसर्गिक परिस्थितीमुळे उत्पादन वाढीचे आशादायक चित्र निर्माण झाले होते. आरबीआयच्या अहवालानुसार २०१९–२०२० या आर्थिक वर्षामध्ये भारतातील अन्नधान्याचे उत्पादन २९२ दशलक्ष टन होण्याचा अंदाज असून २०१८–२०१९ च्या तुलनेत उत्पादनात होणारी ही वाढ २.४ टक्के इतकी असेल. तसेच हे संकट येण्यापूर्वी देशभरातील शेतकऱ्यांसाठी अन्नधान्याच्या किंमतीतील वाढ ही समाधानकारक होती. अन्नधान्य महागाईची सुरवात २०१९ च्या मध्यापासूनच झाली होती. जानेवारी २०२० पर्यंत हा दर २०१३–१४ ला असणाऱ्या उच्चांकाएवढा गेला. परंतु लॉकडाऊमध्ये घातलेल्या निर्बंधाचा फटका हा कृषी क्षेत्र व शेतकऱ्यांनासुध्दा बसलेला आहे. शेतातील माल काढणे आणि तो बाजारपेठेमध्ये विक्रीला आणणे यामध्ये आलेल्या अनेक अडचणींमुळे शेतकरी हवालदील झालेला आहे. सर्वप्रथम शेतमाल काढण्यासाठी आवश्यक कामगारांची कमतरता, माल विक्रीला आणण्यासाठी वाहतूक सुविधेतील अडथळे, जिल्ह्यांची नाकेबंदी, माल खरेदी करणाऱ्या व्यापारांची कमतरता, बाजार समित्यामधील शेतमालाचे मापन करण्यासाठी आवश्यक असलेल्या मनुष्यबळाचा अभाव, मर्यादीत खरेदी इत्यादी समस्येमुळे अनेक शेतकऱ्यांचा माल हा बाजारात विक्रीला आलाच नाही, काही शेतकऱ्यांनी कमी किंमतीला माल विकूण टाकला तर नाशवंत उत्पादन करणाऱ्या अनेक शेतकऱ्यांनी बाजारात योग्य किंमत न मिळाल्यामुळे आणि खरेदीदार न मिळाल्यामुळे फळे व भाजीपाला जनावरांना खाऊ घातली तर काहींनी त्यावरून टॅक्टर व नांगर फिरविले एकंदरीत शेतमाल विपणणातील साखळीमध्ये कोरोना संकटामुळे आलेल्या प्रतिबंधामुळे कृषी क्षेत्राला प्रचंड प्रमाणात नुकसान सहन करावे लागत आहे.

**लॉकडाऊनमुळे शेतकऱ्यांसमोर निर्माण झालेल्या समस्या**

कोरोनाच्या संकटावर सरकारने केलेल्या लॉकडाऊमध्ये कृषी व शेतकऱ्यांसाठी अनेक बाबतीत सुट दिली असली तरी ती केवळ कागदावरच दिसून येते. प्रत्यक्षात मात्र शेतकऱ्यांना या सुट किंवा सवलतीचा लाभ होतांना दिसत नाही.

१) शेतमालाची वाहतूक करणाऱ्या वाहनांची तपासणी करून वाहनधारक आणि शेतकरी यांना वेठीस धरले जात आहे. तासनतास वाहने सोडली जात नसून, त्यांना ताटकळत ठेवले जात आहे.

२) जिल्ह्याच्या सीमा बंद असल्यामुळे बाजारपेठेच्या ठिकाणी माल विक्रीला पाठविणे अवघड झालेले आहे. त्यामुळे स्थानिक ठिकाणीच मालाची कमी येईल त्या भावाने शेतमालाची विक्री करावी लागत आहे.

३) वाहतुकीवरील प्रतिबंध आणि साधनांच्या अभावामुळे फळे व भाजीपाला पीकांचे ६० ते ७० टक्के नुकसान झाले आहे. अनेक फळे व भाजीपाल्यांचे दर निम्यापेक्षाही कमी झालेले आहे.

४) रब्बी हंगामातील पीक काढण्यासाठी मजूरांचा तुटवडा निर्माण झाला आहे. ट्रॅक्टर, हार्वेस्टर, खते, रासायनिक किटकनाशके वेळेवर मिळत नसल्याने शेतकरी अडचणीत आला आहे.

५) शेतकऱ्यांच्या खरीप हंगामातील कामे सुरू होण्याचा काळ आला असल्यामुळे या हंगामासाठी त्यांना भांडवल, खते, बियाने, किटकनाशके कसे मिळणार याची काळजी लागलेली आहे.

६) खरीप हंगामासाठी नांगरणीचा काळ सुरू झाला असून ट्रॅक्टरसाठी लागणाऱ्या डिझेलसाठी शेतकऱ्यांना शहरात यावे लागते. परंतु प्रतिबंधामुळे शेतकऱ्यांसमोर अडचण निर्माण झाली आहे.

**केंद्र सरकारचे आर्थिक पॅकेज :**

अर्थमंत्री निर्मला सितारमण यांनी कारोना संकटामध्ये अर्थव्यवस्थेतील विविध घटकांना दिलासा देण्यासाठी १.७० लाख कोटी रूपयांचं मदतीचे पॅकेज जाहीर केले आहे. यामुळे भारतातील ८० कोटी गरीबांना दिलासा मिळेल असा आशावाद व्यक्त केला आहे. यामध्ये लोकांच्या खात्यामध्ये थेट पैसे टाकणे, त्यांच्यासाठी अन्नधान्याची तरतुद करून सरकार गरीब, रोजंदारीवर काम करणारे मजूर, शेतकरी आणि मूलभूत सुविधांपासून वंचित असणाऱ्यांना मदत मिळणार आहे. या पॅकेजच्या माध्यमातून देशातील ८ कोटी ६९ लाख शेतकऱ्यांना पंतप्रधान कृषी योजनेअंतर्गत एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवड्यात २ हजार रूपये आणि त्यानंतर पुढचे दोन महिने सरकार शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये २००० रूपये जमा करणार आहे. सध्याच्या संकटावर मात करण्यासाठी सरकारने तब्बल ३८.६ कोटी जन धन खात्यांवर थेट पैसे जमा करण्यास सुरवात केल्यामुळे हे खाते असणाऱ्या शेतकरी वर्गासोबतच इतरांना त्याचा लाभ मिळणार आहे.

**उपसंहार :**

कोरोना संकटाच्या काळात सर्वात जास्त रोजगार उपलब्ध करून देणारा आणि अर्थव्यवस्थेच्या आर्थिक व्यवस्थेचा कणा असलेल्या शेती क्षेत्रातील उत्पादनावर पुरवठा साखळी तुटल्याचा गंभिर परिणाम होत आहे. परंतु भारतामध्ये अन्नधान्याचा पुरेसा साठा असल्यामुळे तसेच सरकारने अर्थव्यवस्थेच्या गरजेप्रमाणे कोरोना संकटाच्या काळात शेती व शेतकऱ्यांसाठी सुट व सवलती दिल्यामुळे देशामध्ये समोरच्या काळातही अन्नधान्य, फळ व भाजीपाल्यांची टंचाई जाणावणार नाही हे विशेष. भारताच्या जीडीपीत शेतीचा वाटा १४ ते १५ टक्के इतका कमी असला तरी जीवनावश्यक वस्तूचा तुटवडा निर्माण होणार नाही. त्यामुळे आपल्याला इतर देशावर अवलंबून राहण्याची गरज भासणार नाही. तरीसुध्दा कोरोना संकटाच्या काळात सर्वात जास्त समस्या ही अन्नपदार्थ, फळे, भाजीपाला इत्यादी जीवनावश्यक वस्तूंच्या बाबतीत उद्‌भवली आहे. या उत्पादनासाठी ऑनलॉईन साखळी उपलब्ध नसल्यामुळे अनेक लोकांना या वस्तू मिळण्यामध्ये अडचणी निर्माण झालेल्या आहेत. भारतामध्ये कृषी मालाच्या विपणणामध्ये शेतकरी आणि ग्राहक यांच्या दरम्यान मध्यस्थांचा वर्ग

अधिक असल्यामुळे शेतकऱ्यांचे सर्वाधिक नुकसान होत आहे. कोणत्याही बाजारपेठेत मध्यस्थांची भूमिका अत्यंत महत्वाची मानली जाते. परंतु जेव्हा त्यांचा हस्तक्षेप प्रमाणापेक्षा अधिक वाढतो तेव्हा ते नुकसानदायक ठरते. कोरोना संकटाच्या काळात सर्वात जास्त मागणी ही अन्नधान्य, फळे व भाजीपाला इत्यादी जीवनावश्यक वस्तूंना आहे जी शेतीतून निर्माण होते. परंतु मागणी असूनही शेतकऱ्यांना मात्र या उत्पादनाला योग्य भाव मिळाला नाही. त्यामुळे कोरोना संकटानंतरच्या काळात शेतकऱ्यांना थेट त्यांची उत्पादने ग्राहकांना विकता आली पाहिजे अशी साखळी निर्माण होणे आवश्यक आहे. याकरीता अशा मालासाठी ऑनलॉईन पद्वतीने व्यवहार करण्यावर भर दिला पाहिजे शेतमाल वितरणाची साखळी मजबूत केली पाहिजे. सध्या शेतमाल विपणनामध्ये शेतकऱ्यांना ज्या अडचणींना आणि समस्यांना तोंड द्यावे लागत आहे त्या भविष्यामध्ये कमी केल्या झाल्या तरच शेतकऱ्यांच्या समस्या काही प्रमाणात कमी होतील. तसेच शेती आणि शेतकऱ्यांसाठी सरकारने पॅकेजच्या माध्यमातून जाहिर केलेली आर्थिक मदत शेतऱ्यापर्यंत पोहचली पाहिजे. आर्थिक मदतीच्या अमंलबजावणीतील अडथळे दुर केले पाहिजेत.

**संदर्भसुची स्त्रोत**

१) दैनिक वर्तमानपत्र : लोकमत, सकाळ, देशोन्नती

२) ॲग्रोवन, कृषकोन्नती पत्रिका

२) न्युज चॅनेलच्या माध्यमातून उपलब्ध झालेली माहिती

३) www.google.com उपलब्ध माहिती